# जळगांव जिल्हा माथाडी व असंरक्षित कामगार मंडळ, जळगांव.

## वैधानिक लेखापरीक्षण व वार्षिक अहवाल सन २००२-२००३


* कार्यालय *
७ ब, निर्मल भुवन, विवेकानंद नगर,
जिल्हापेठ, जळगांव.
फोन : २२२२००४

# जळगांव जिल्हा माथाडी व असंरक्षित कामगार मंडळ, जळगांव.

## अनुक्रमणिका


| अ.क्र. | तपशील | |
|---|---|---|
| १) | प्रास्ताविक | |
| २) | मंडळाचे कार्यक्षेत्र | |
| ३) | पदाधिकारी | |
| ४) | मंडळाच्या बैठका | |
| ५) | मालक नोंदणी | |
| ६) | कामगार नोंदणी | |
| ७) | उत्पन्नाच्या बाबी | |
| ८) | कामगारांची मजुरी | |
| ९) | अधिभार व तिचा विनीयोग | |
| १०) | हिशोब तपासणी | |
| ११) | आभार | |
| १२) | विहित नमुना क | |
| १३) | लेखा परिक्षकांचे प्रमाणपत्र | |
| १४) | लेखा परिक्षण रिपोर्ट<br>(नफा-तोटा पत्रक, ताळेबंद) | |

# जळगांव जिल्हा माथाडी व असंरक्षित कामगार मंडळ, जळगांव.

## कामकाज अहवाल
## सन २००२-२००३

**१) प्रस्तावना :-**

विशिष्ट नोकऱ्यांमध्ये कामावर ठेवलेल्या माथाडी, हमाल इत्यादी सारख्या असंरक्षित श्रमजीवी कामगारांच्या नोकरीचे नियमन करणे, त्यांच्या अटी व शर्ती यासाठी अधिक चांगली तरतुद करणे, त्याचप्रमाणे अशा नोकरीत ज्या ठिकाणी त्यांचे कल्याण, आरोग्य व इतर सुरक्षिततेचे उपाय योजणे आवश्यक असेल, तेथे त्यांच्या कल्याणासाठी, आरोग्यासाठी व इतर सुरक्षिततेच्या उपायांसाठी तरतूद करणे, टाळता येण्याजोग्या बेकारीस प्रतिबंध करण्यासाठी अशा नोकरीत कामगारांचा पुरेसा पुरवठा होईल आणि त्यांचा पूर्णपणे व यथोचित उपयोग केला जाईल हे निश्चित करण्यासाठी तरतुद करणे, या व अशा प्रकारच्या प्रयोजनांसाठी अशा नोकरीच्या संबंधात व आवश्यक असेल तेथे राज्याच्या निरनिराळ्या क्षेत्रात माथाडी स्थापन करण्याची तरतूद करणे, यासाठी महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र माथाडी, हमाल व इतर श्रमजीवी कामगार (नोकरीचे नियमन व कल्याण) अधिनियम, १९६९ तयार केला.

महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र माथाडी, हमाल व इतर श्रमजीवी कामगार (नोकरीचे नियमन व कल्याण) अधिनियम, १९६९ अंतर्गत कलम ६ च्या तरतुदीनुसार कोणत्याही क्षेत्रातील कोणत्याही अनुसूचित धंद्यासाठी, शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे, त्या विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा नावाने ओळखण्यात येणाऱ्या मंडळाची स्थापना करण्याचे अधिकार राज्य शासनास प्रदान करण्यात आलेले आहेत. त्याप्रमाणे अधिनियमाचे कलम ३ नुसार अशा नोकऱ्यांमध्ये असंरक्षित कामगारांचा पुरवठा व्हावा व त्यांचा यथोचित उपयोग व्हावा, यासाठी व सामान्यत: अशा कामगारांच्या नोकऱ्यांच्या अटी व शर्ती या करीता अधिक चांगल्या तरतुदी करता याव्यात यासाठी, राज्य शासनास योजनेद्वारे कोणत्याही अनुसूचित धंद्यातील मालकांनी व असंरक्षित कामगारांच्या नोंदणीची तरतुद करण्याचे अधिकार प्रदान करण्यांत आलेले आहेत.

त्यानुसार उपरोक्त नमुद केलेल्या तरतूदी अंतर्गत अधिकाराने, राज्य शासनाने, अधिसूचना उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग क्र. युडब्ल्युए/सीआर/१५८७/(११४७२)/काम-५, दिनांक २७ सप्टेंबर १९९० अन्वये जळगाव जिल्ह्यातील नऊ अनुसूचित उद्योगांसाठी मसुदा अधिसूचना प्रसारीत करुन संबंधितांच्या सुचना व हरकती मागविल्या.

तद्नंतर शासकिय अधिसूचना उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग क्र.

युडब्ल्युए/१५८७/(११४७२)/काम-५, दिनांक २६ मार्च १९९२ अन्वये जळगाव जिल्हा माथाडी व असंरक्षित कामगार मंडळाची स्थापना महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र माथाडी, हमाल व इतर श्रमजीवी कामगार (नोकरीचे नियमन व कल्याण) अधिनियम, १९६९ अंतर्गत कलम ६ खाली करण्यांत आली. मंडळाच्या प्रत्यक्ष कामकाजास दिनांक ०१ सप्टेंबर १९९३ पासून सुरुवात झाली.

**२) मंडळाचे कार्यक्षेत्र :-**

संपूर्ण जळगांव जिल्हा हे मंडळाचे कार्यक्षेत्र आहे.

जळगांव माथाडी मंडळाचे कार्यकक्षेत खालील उद्योग व व्यवसाय यांचा समावेश आहे.

१) लोखंड व पोलाद बाजार आणि दुकाने.

२) कापड व धागा आणि कापूस बाजार.

३) किराणा बाजार व दुकाने.

४) बाजार, कारखाने व इतर आस्थापना.

५) रेल्वे यार्डस् व मालधक्के.

६) सार्वजनिक माल वाहतूक व्यवसाय.

७) भाजीपाला बाजार.

८) महाराष्ट्र कृषी उत्पन्न बाजार (नियमन), १९६३ खाली स्थापन झालेल्या बाजार समित्या / संस्था.

९) अन्नधान्य गोदामे.

**३) मंडळाचे पदाधिकारी :-**

अहवाल सालात प्रातिनिधीक मंडळ कार्यरत होते व मंडळाचे अध्यक्ष म्हणून श्री. व.स. तेजाळे, सहाय्यक कामगार आयुक्त, जळगांव यांनी तर सचिव श्री. जी.जे. दाभाडे, सरकारी कामगार अधिकारी, जळगांव यांनी कामकाज पाहिले.

**४) मंडळाच्या बैठका :-**

अहवाल वर्षात दैनंदिन कामकाजा व्यतिरिक्त मंडळाच्या तीन बैठका झाल्या.

**५) मालक नोंदणी :-**

अहवाल वर्षात योजनेच्या कलम १४ प्रमाणे नोंदणी झालेल्या एकूण मालक/व्यापारी यांची संख्या खालील प्रमाणे आहे.

| दिनांक ३१-०३-२००२ पर्यंत नोंदीत मालकांची एकूण संख्या | अहवाल वर्षात नोंदीत झालेल्या मालकांची एकूण संख्या | दिनांक ३१-०३-२००३ अखेर नोंदीत मालकांची एकूण संख्या |
|---|---|---|
| ४७२ | १३ | ४८५ |

**६) कामगार नोंदणी :-**

मंडळाच्या योजनेच्या कलम १५ प्रमाणे सन २००२-२००३ अहवाल वर्षामधील कामगारांची नोंदणी, निवृत्ती राजीनामा, याबाबतची माहिती खालील प्रमाणे आहे.

| दि. ३१-०३-२००२ पर्यंत नोंदीत कामगारांची एकूण संख्या | अहवाल वर्षात नोंदीत झालेल्या कामगारांची एकूण संख्या | अहवाल वर्षात निवृत्त, मयत झाल्यामुळे राजीनामा दिलेल्या कामगारांची एकूण संख्या | दि. ३१-०३-२००३ अखेर नोंदीत कामगारांची एकूण संख्या |
|---|---|---|---|
| ३३०९ | ७९ | ८२ | ३३०६ |

**७) उत्पन्नाच्या बाबी :-**

मंडळाच्या उत्पन्नाच्या बाबी म्हणजे मालक/व्यापारी यांनी दिलेली लेव्ही व कामगार यांनी भरलेले नोंदणी शुल्क, बँकेत ठेवलेल्या मुदतठेवी व बचत ठेवीवरील व्याज, व इतर होय.

अहवाल वर्षात सर्व बाजूंनी मिळालेले उत्पन्न खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १) | प्रशासकीय निधी | ९,४७,२३९.५२ |
| २) | बँकेतील बचत खात्यातील व्याज | ५५,६२६.९२ |
| ३) | नोंदणी शुल्क (मालक/कामगार) | ५४८.०० |
| ४) | ओळखपत्र फी | १९०.०० |
| ५) | ट्रिपल बुक फी | ५८०.०० |
| ६) | बोहणी व व्याज जमा | ३,४९,१३०.३९ |
| ७) | रेव्हेन्यू स्टॅम्प फी | ४,८७९.०० |
| | एकूण - | १३,५८,१९३.८३ |

**८) कामगारांची मजुरी :-**

अहवाल वर्षात कामगारांच्या मजुरी पोटी मंडळाकडे एकूण रक्कम रुपये २,२३,१२,७७६/-

जमा झाली.

## ९) अधिभार (लेव्ही) व तिचा विनियोग :-

अधिनियम आणि मंडळाची योजना यामध्ये नोंदीत कामगारांना विविध लाभ देण्याबाबतच्या तरतूदी आहेत. मंडळाची योजना राबविण्यासाठी तसेच नोंदीत कामगारांना सोयी, सुविधा व फायदे देण्यासाठी योजनेच्या कलम ४१ मध्ये नोंदीत मालकांकडून अधिभार (लेव्ही) वसुल करण्याची तरतुद आहे. मंडळाच्या दि. २४/०५/१९९३ रोजी झालेल्या बैठकीतील ठराव क्र. २ नुसार २३% लेव्हीचा दर निश्चित करण्यात आलेला आहे. तद्नंतर शासन निर्णयानुसार दि. ०१/०१/१९९८ पासून लेव्हीचा दर २५% प्रमाणे करण्यात आलेला आहे.

लेव्हीची विभागणी/विगतवारी खालील प्रमाणे ठरविण्यात आलेली आहे.

| | | |
|---|---|---|
| अ) | भविष्य निर्वाह निधी | ८.३३% |
| ब) | उपदान | २.५०% |
| क) | सानुग्रह अनुदान | ६.००% |
| ड) | भरपगारी सुट्ट्या | १.००% |
| इ) | रजावेतन | १.००% |
| ई) | अपघात नुकसान भरपाई | १.५०% |
| उ) | राखीव | ०.६७% |
| ऊ) | प्रशासकीय | ४.००% |
| | एकूण – | २५.००% |

### अ) भविष्य निर्वाह निधी :-

अहवाल सालात भविष्य निर्वाह निधीचा अंशदानाचा दर मजुरीच्या ८.३३% इतका होता. अहवाल साली कामगारांकडून भविष्य निर्वाह निधीतील त्यांचे अंशदान म्हणून रुपये १८,५३,७३८/– इतकी रक्कम त्यांच्या मजूरीतून मंडळाकडे जमा झाली व तितकीच रक्कम मंडळाने अंशदान म्हणून जमा करण्यात आली. अहवाल साली अंशदानावर ६% दराने व्याजाची आकारणी करुन संबंधित वर्गणीदाराच्या खात्यामध्ये जमा करण्यात आली. अहवाल साली एकूण कामगारांच्या त्यांनी दिलेल्या राजीनामा, मृत्यूमुळे मंडळाने त्यांच्या खाती जमा असलेली भविष्य निर्वाह निधीची एकूण रक्कम रुपये ८,०५,९४२/– अदा करण्यात आली असून अहवाल साली या खात्यावर रुपये २,१०,४४,८९७/– इतकी शिल्लक आहे व वाढीव रक्कम मंडळाने स्वतंत्रपणे राखीव (भविष्य निर्वाह निधी) या खात्यात

रुपये ४०,५३,१७१/– इतकी रक्कम जमा करण्यात आली.

**ब) उपदान :-**

मंडळाने कामगारांसाठी २.५०% दराने लेव्हीतून उपदानाची तरतूद निर्धारीत केली आहे. त्यानुसार अहवाल साली एकूण रक्कम रुपये ५,९२,०२४/– सदरहू निधीत जमा झाली. अहवाल साली रुपये २३,८५५/– इतकी रक्कम कामगारांनी दिलेल्या राजीनामा, मृत्यूमुळे मंडळाने त्यांची खाती जमा उपदानाची एकूण रक्कम रुपये वाटप करण्यात आली असून अहवाल साला अखेर रुपये ३९,८६,३४३/– इतकी शिल्लक आहे व उर्वरित वाढीव रक्कम मंडळाने स्वतंत्रपणे राखीव (उपदान) या खात्यात रुपये ७,७४,३४२/– इतकी रक्कम जमा करण्यांत आली.

**क) सानुग्रह अनुदान :-**

अहवाल साली कामगारांसाठी दिवाळी सानुग्रह अनुदानाकरीता ६% लेव्हीची तरतुद करण्यात आली होती. मंडळाचे आर्थिक वर्ष एप्रिल ते मार्च असे आहे. लेव्हीच्या अहवाल साली ६% तरतूदीनुसार सन २००२–२००३ या वर्षाकरीता रुपये १४,२०,८५८/– एवढी रक्कम जमा झाली व रुपये १२,३६,७०७/– इतकी रक्कम शिल्लक आहे व उर्वरित वाढीव रक्कम मंडळाने नफा–तोटा पत्रकांत रुपये २,०२,८२७/– इतकी रक्कम जमा करण्यात आली.

**ड) भरपगारी सुट्ट्या :-**

यासाठी मंडळाने १.००% लेव्हीची तरतूद केलेली आहे. अहवाल साली या खाती एकूण रक्कम रुपये २,३६,८१०/– इतकी जमा झाली व रुपये २,०६,११८/– अहवाल साली वाटप करण्यात आली असून अहवाल साली या खात्यावर रुपये २,३६,८१०/– इतकी रक्कम शिल्लक आहे व उर्वरित वाढीव रक्कम मंडळाने नफा–तोटा पत्रकांत रुपये ७३,१५२/– इतकी रक्कम जमा करण्यात आली.

**इ) रजा वेतन :-**

यासाठी मंडळाने १.००% लेव्हीची तरतूद केलेली आहे. अहवाल साली या खाती एकूण रक्कम रुपये २,३६,८१०/– इतकी जमा झाली व रुपये २,०६,११८/– अहवाल साली वाटप करण्यात आली असून अहवाल साली या खात्यावर रुपये २,३६,८१०/– इतकी रक्कम शिल्लक आहे व उर्वरित वाढीव रक्कम मंडळाने नफा–तोटा पत्रकांत रुपये ७३,१५२/– इतकी रक्कम जमा करण्यात आली.

**ई) अपघात नुकसान भरपाई :-**

यासाठी मंडळाने १.५०% लेव्हीची तरतूद केलेली असून त्या तरतुदीनुसार अहवाल वर्षात रुपये ३,५५,२१३/– इतकी रक्कम जमा झाली. अहवाल सालात कामगारांच्या अपघात विम्यापोटी राजीनाम्यातून रुपये ८,४५०/– जमा झाले असून अहवाल सालात माथाडी कामगारांचा विमा

उतरविणेपोटी विमा कंपनीस रुपये ४,२९,६६०/- इतका खर्च करण्यात आलेला असून अहवाल साला अखेर अपघात नुकसान भरपाईच्या खात्यात रुपये ६,९१,५९१/- इतकी रक्कम शिल्लक आहे.

**उ) राखीव निधी :-**

मंडळाने लेव्हीतून ०.६७% रकमेची तरतूद राखीव निधीसाठी केलेली असून अहवाल सालात रुपये १,६४,६५८/- एवढी रक्कम जमा झालेली आहे. अहवाल वर्षा अखेर राखीव निधी खात्यावर रुपये ११,००,८९३/- शिल्लक आहे.

**ऊ) प्रशासकीय खर्च :-**

अहवाल सालात मंडळाच्या प्रशासकीय कामकाजासाठी ४.००% दराने लेव्हीची तरतूद करण्यात आली असून एकूण रुपये ९,४०,६७७.३७ एवढी रक्कम जमा झालेली असून व्यवस्थापकीय खर्चापोटी एकूण रक्कम रुपये ८,५१,४३१.०० एवढा खर्च झालेला आहे. त्यामुळे अहवाल वर्षात प्रशासकीय खात्यात एकूण रक्कम रुपये १५,५०,९९४.१० इतकी शिल्लक आहे.

**१०) हिशोब तपासणीसाचा अहवाल व हिशोब :-**

सन २००२-२००३ चे वैधानिक लेखा परिक्षण करण्यासाठी मे. राजेश आर. कळंत्री आणि असो. या सनदी लेखापालाची नियुक्ती केली. त्यांनी केलेल्या हिशोब तपासणीचा अहवाल व प्रमाणपत्र तसेच जमा खर्चाची विवरणपत्रे आणि ताळेबंदाची प्रत सोबत जोडली आहे.

**११) आभार :-**

मंडळाचे कामकाज सुरळीत व प्रभावीपणे करण्यासाठी दिलेल्या सहकार्याबद्दल मंडळ सर्वश्री मा. प्रधान सचिव (कामगार), मा. कामगार आयुक्त, मा. सह आयुक्त कामगार, मुंबई तसेच मंडळातील सर्व नोंदीत मालक व त्यांच्या संघटना आणि मंडळातील नोंदीत कामगार व त्यांच्या कामगार संघटना तसेच मंडळाने सनदी लेखापाल यांचेही आभारी आहे.

| | |
|---|---|
| **(एस. एस. चव्हाण)** | **(जी. जे. दाभाडे)** |
| सचिव, | अध्यक्ष, |

**जळगांव जिल्हा माथाडी व असंरक्षित कामगार मंडळ,**
**जळगांव.**

# जळगांव जिल्हा माथाडी व असंरक्षित कामगार मंडळ, जळगांव.

## (विहीत नमुना - क)

## सन २००१-२००३ या वार्षिक अहवालासंबंधी (विलंबाची कारणे)

| | | |
|---|---|---|
| १) | लेखा परिक्षणाचे आर्थिक वर्ष केव्हा संपते | : दिनांक ३१-०३-२००३ |
| २) | मंडळाने लेखा परिक्षक नेमण्याबाबतचा प्रस्ताव शासनाकडे केव्हा सादर केला | : पत्र क्र. ७७०/२००३ |
| ३) | कामगार आयुक्त, मुंबई यांनी प्रस्ताव शासनास केव्हा सादर केला. | : क. काआ/माथाडी/जळगांव/१५-२/१६०/ कार्या-१४, दि. १४/११/०३ |
| ४) | मंडळाच्या लेखा परिक्षक नेमण्याच्या प्रस्तावास शासनाने केव्हा मंजुरी दिली. | : दिनांक ११ मे २००४ |
| ५) | लेखा परिक्षकांची नेमणूक केव्हा झाली, शासन निर्णय व दिनांक. | : क. युडब्ल्युए-१५२००३ (१८४/१२)/काम-५, दिनांक ११ मे २००४) |
| ६) | लेखा परिक्षकाचे नांव व पत्ता | : मे. राजेश आर. कळंत्री ॲन्ड असो. सनदी लेखापाल, गांधी नगर, जिल्हा पेठ, जळगांव |
| ७) | लेखा परिक्षक यांनी लेखा परिक्षण केव्हा सुरु केले. | : दिनांक १२ एप्रिल २०१० |
| ८) | लेखा परिक्षक यांनी लेखा परिक्षण अहवाल मंडळाला किंवा शासनाला केव्हा सादर केला. | : दिनांक २१ सप्टेंबर २०१० |
| ९) | शासनाने मंडळाकडे अभिप्रायासाठी केव्हा पाठविला त्याचा पत्र क्र. व दिनांक. | : दिनांक २४ सप्टेंबर २०१० |
| १०) | मंडळाच्या बैठकीपुढे केव्हा सादर केला. | : दिनांक २७ सप्टेंबर २०१० |
| ११) | मंडळाने कामगार आयुक्त, मुंबई यांचे मार्फत शासनास केव्हा पाठविला. | : |
| १२) | शासनाने अहवालासंबंधी विलंबाची कारणे केव्हा सादर करण्यास कळविले. | : |
| १३) | मंडळाने शासनास अहवालासंबंधी विलंबाची कारणे केव्हा सादर केली. | : |
| १४) | कामगार आयुक्त, मुंबई यांनी आपले अभिप्राय देवून शासनाकडे केव्हा पाठविला | : |
| १५) | शासनाकडून मंजुरी केव्हा मिळाली, त्याचा पत्र क्र. व दिनांक | : |
| १६) | मुद्रणासाठी केव्हा पाठविला | : |
| १७) | मुद्रण होवून शासनास केव्हा सादर केला. | : |
| १८) | अहवाल विलंब होण्याची कारणे कोणती. | : |

# वैधानिक लेखा परिक्षणाचा अहवाल

**(महाराष्ट्र माथाडी हमाल व इतर श्रमजीवी कामगार अधिनियम, १९६९ कलम ८ आणि महाराष्ट्र माथाडी हमाल व इतर श्रमजीवी कामगार योजना, १९९२ अन्वये)**

आम्ही जळगाव माथाडी व असंरक्षित कामगार मंडळ जळगाव च्या सोबत जोडलेल्या ३१ मार्च, २००३ या दिनांकाचा ताळेबंद व सन २००२-२००३ या वर्षाचे नफा तोटा पत्रक तपासले असून अहवाल करतो की,

१) आमच्या लेखा परिक्षणाच्या उद्देशासाठी आमच्या संपूर्ण ज्ञानाप्रमाणे, माहितीप्रमाणे व विश्वासाप्रमाणे खालील प्रमाणे जरुर ती माहिती व खुलासे आम्हाला उपलब्ध झाले आहेत.

२) आमच्या मते आम्हाला मिळालेल्या माहिती व खुलाशाच्या आधारे –

अ) ताळेबंद व नफा तोटा पत्रक मंडळाने ठेवलेल्या हिशोबी पुस्तकाशी जुळते मिळते असून सदर दिनांक ३१/३/२००३ या दिनांकाचा ताळेबंद मंडळाच्या व्यवहाराची कामकाजाची सत्य व वास्तव स्थिती दर्शवितो आणि नफा तोटा पत्रकाचे बाबतीत त्या दिनांकास संपणाऱ्या वर्षातील नफ्याची सत्य व वास्तव स्थिती दर्शवितो.

ब) मंडळाचे हिशोब हे त्यावरील टिप्पणीस पात्र राहून महाराष्ट्र माथाडी व हमाल व इतर श्रमजीवी कामगार अधिनियम, १९६९, महाराष्ट्र माथाडी हमाल व इतर श्रमजीवी कामगार योजना १९९२ नुसार आवश्यक ती माहिती देणारे आहेत व मंडळाच्या आर्थिक व्यवहारांची वास्तव स्थिती दर्शवितात.

३) आमच्या मते मंडळाचे महाराष्ट्र माथाडी हमाल व इतर श्रमजीवी कामगार अधिनियम, १९६९ आणि जळगाव जिल्हा माथाडी व इतर श्रमजीवी कामगार योजना १९९२ नुसार आवश्यक असणारी हिशोबी पुस्तके योग्य रितीने ठेवलेली आहे.

आमच्या आज रोजीच्या शेऱ्यास अनुसरुन

**For Rajesh R. Kalantri & Associates**
**Chartered Accountants**

स्थळ :- जळगाव
दिनांक : २१ सप्टेंबर २०१०

**(Rajesh R. Kalantri)**
**Proprietor**
**(M.No. 103486)**

# जळगांव जिल्हा माथाडी व असंरक्षित कामगार मंडळ, जळगांव.

## जळगांव मुख्यालय नफा-तोटा पत्रक (सर्व शाखा) सन २००२-२००३

| खर्च | रुपये | रुपये | उत्पन्न | रुपये | रुपये |
|---|---|---|---|---|---|
| कर्मचारी वेतन | ६,०७,४१४.०० | ६,१७,१६४.०० | प्रशासकीय लेव्ही जमा | | ९,४७,२३९.५२ |
| रोजंदारी कर्मचारी वेतन | ९,७५०.०० | | जळगांव | ५,८०,७९२.०० | |
| टेलिफोन खर्च | | २३,०७६.०० | पाचोरा | ९५,२२७.८० | |
| वीजबिल खर्च | | ५,११०.०० | चाळीसगांव | १,१८,३६१.६८ | |
| कर्मचारी प्रवास खर्च | | ४१,१४८.०० | अमळनेर | ८१,७७०.१६ | |
| अधिकारी प्रवास खर्च | | ७,९७५.०० | पारोळा | ९,२४१.४८ | |
| अधिकारी मानधन खर्च | | ४९,९९३.०० | एरंडोल | २४,७९७.४४ | |
| कायदेशीर बाबी खर्च | | १०,०००.०० | भुसावळ | ८,१७८.८८ | |
| लेखापरिक्षण खर्च | | ११,५००.०० | रावेर | २८,८७०.०८ | |
| किरकोळ खर्च | | २,३५३.०० | बँक व्याज जमा | | ५५,६२६.९२ |
| वर्तमानपत्र खर्च | | ६१०.०० | जळगांव | ३१,५८९.२५ | |
| पोस्टेज खर्च खाते | | २,०३४.०० | पाचोरा | १,८६०.०० | |
| बँक कमिशन खर्च | | ४,२४०.०० | चाळीसगांव | २,३८१.०० | |
| प्रिंटींग ॲन्ड स्टेशनरी | | ७९,४८५.०० | अमळनेर | ९,१४५.६८ | |
| जळगांव | ७९,२६६.०० | | पारोळा | ३,८२९.०० | |
| चाळीसगाव | ४४.०० | | एरंडोल | ३,७४६.०० | |
| रावेर | १७५.०० | | भुसावळ | ५०५.०१ | |
| ऑफिस भाडे खर्च | | २५,८००.०० | रावेर | २,५७०.९८ | |
| जळगांव | २४,०००.०० | | मालक नोंदणी फी | | ३९०.०० |
| पाचोरा | १,८००.०० | | जळगांव | २१०.०० | |
| रेव्हेन्यू स्टॅम्प फी | | ३,८७७.०० | भुसावळ | १८०.०० | |
| जळगांव | ३७६० | | कामगार नोंदणी फी | | १५८.०० |
| पारोळा | १७ | | जळगांव | ६.०० | |
| रावेर | १०० | | चाळीसगाव | ८२.०० | |
| शाखा (प्रशासकीय) | | ३,५१,७६३.३७ | भुसावळ | ७०.०० | |
| पाचोरा | ७५,१७३.०० | | ओळखपत्र फी | | १९०.०० |
| चाळीसगाव | १,०७,७५७.०० | | जळगांव | १५.०० | |
| अमळनेर | ८२,१३१.०० | | भुसावळ | १७५.०० | |
| पारोळा | १३,४७४.०० | | सानुग्रह अनुदान ठेव व्याज | | २,०२,८२६.६७ |
| एरंडोल | ४०,९१६.०० | | जळगांव | ३०,५४०.४५ | |
| भुसावळ | ६,३०१.३७ | | चाळीसगाव | १,०५,८१४.५७ | |

| खर्च | रुपये | रुपये | उत्पन्न | रुपये | रुपये |
|---|---|---|---|---|---|
| रावेर | २६,००१.०० | | अमळनेर | ५०,९१०.८३ | |
| कर्मचारी भ.नि. निधी | | ४४,४२६.०० | पारोळा | १५,३१५.६१ | |
| सानुग्रह अनुदान | | २८,३६२.७८ | भुसावळ | २४५.२१ | |
| पाचोरा | २४,४४४.५४ | | भरपगारी सुट्‌ट्या ठेव व्याज | | ७३,१५१.८६ |
| एरंडोल | ६४२.८४ | | जळगाव | ४३,२९६.७३ | |
| रावेर | ३,२७५.४० | | चाळीसगाव | १९,०११.८९ | |
| भरपगारी सुट्‌ट्या | | २,७८३.६१ | अमळनेर | ७,६५४.६७ | |
| पाचोरा | १,५१३.३१ | | पारोळा | २,८७३.०८ | |
| एरंडोल | ३८५.४० | | भुसावळ | ३०७.४९ | |
| रावेर | ८८४.९० | | रजावेतन ठेव व्याज | | ७३,१५१.८६ |
| रजा वेतन | | २,७८३.६१ | जळगाव | ४३,२९६.७३ | |
| पाचोरा | १,५१३.३१ | | चाळीसगाव | १९,०११.८९ | |
| एरंडोल | ३८५.४० | | अमळनेर | ७,६५४.६७ | |
| रावेर | ८८४.९० | | पारोळा | २,८७३.०८ | |
| सरप्लस | | ३,९५,३१२.८३ | भुसावळ | ३०७.४९ | |
| | | | इतर रेव्हेन्यू | | ४,८७९.०० |
| | | | जळगाव | ४,२२३.०० | |
| | | | पारोळा | ७५.०० | |
| | | | भुसावळ | ६०.०० | |
| | | | एरंडोल | १३६.०० | |
| | | | अमळनेर | ३८५.०० | |
| | | | ट्रिपल बुक फी जमा | | ५८०.०० |
| | | | जळगाव | १५०.०० | |
| | | | चाळीसगाव | १७०.०० | |
| | | | भुसावळ | २६०.०० | |
| | | | प्रशासकीय इतर शाखा | | ३,५१,७६३.३७ |
| एकूण – | | १७,०९,९५७.२० | एकूण – | | १७,०९,९५७.२० |

आमच्या आज रोजीच्या अहवाल व शेऱ्यास अनुसरून
दि. २१/०९/२०१०

सचिव, अध्यक्ष,
जळगांव माथाडी व असंरक्षित कामगार मंडळ,
जळगाव

Rajesh R. Kalantri & Asso.
Chartered Accountants

# जळगांव जिल्हा माथाडी व असंरक्षित कामगार मंडळ, जळगांव.

## जळगांव मुख्यालय ताळेबंद (सर्व शाखा) सन २००२-२००३

| देणी | रुपये | रुपये | येणी | रुपये | रुपये |
|---|---|---|---|---|---|
| लेव्ही | | | गुंतवणूक | | |
| भविष्य निर्वाह निधी | | २,१०,४४,८९७.०० | भविष्य निर्वाह निधी | | १,९५,८९,७२०.८४ |
| जळगाव | १,१२,४२,३०८.०० | | जळगाव | ९०,३३,७३५.०० | |
| पाचोरा | २८,७५,००५.०० | | पाचोरा | ३३,४२,३३९.३६ | |
| चाळीसगाव | ३५,७०,८९८.०० | | चाळीसगाव | ३९,४९,११७.०० | |
| अमळनेर | २३,२४,७६२.०० | | अमळनेर | २४,८४,२६८.४२ | |
| पारोळा | ४,१६,३१५.०० | | पारोळा | २,३९,८३१.८४ | |
| एरंडोल | २,९७,२३२.०० | - | एरंडोल | ३,०९,५७०.०० | |
| भुसावळ | ५९,३४२.०० | | भुसावळ | २६,२४५.२२ | |
| रावेर | २,५९,०३५.०० | | रावेर | २,०४,६१४.०० | |
| उपदान | | ३९,८६,३४३.२५ | उपदान | | ४५,७२,४८६.८५ |
| जळगाव | २१,९०,८९४.३२ | | जळगाव | ११,९३,८१२.०० | |
| पाचोरा | ६,५६,१४१.७१ | | पाचोरा | १२,५१,५७२.२६ | |
| चाळीसगाव | ५,६७,१५८.०० | | चाळीसगाव | ७,७९,८४१.०० | |
| अमळनेर | ३,७७,७०२.२० | | अमळनेर | ४,२३,९०२.०० | |
| पारोळा | ८९,२५३.७१ | | पारोळा | ३६,०१८.२४ | |
| एरंडोल | ५८,४११.९५ | | एरंडोल | ५२,६५०.०० | |
| भुसावळ | ११,२४७.५६ | | भुसावळ | ३,९३८.३५ | |
| रावेर | ३५,४५३.८० | | रावेर | ३०,७५३.०० | |
| बोनस | | १४,२०,८५९.२८ | बोनस | | १६,३४,००४.७४ |
| जळगाव | ८,७१,१८८.०० | | जळगाव | ९,००,५७४.०० | |
| पाचोरा | १,४२,८४१.७० | | पाचोरा | १,७९,०८९.०० | |
| चाळीसगाव | १,७७,५४२.५२ | | चाळीसगाव | ३,५१,६८०.०० | |
| अमळनेर | १,२२,६५५.२४ | | अमळनेर | १,२२,३३६.०० | |
| पारोळा | १३,८६२.२२ | | पारोळा | १२,९३१.०० | |
| एरंडोल | ३७,११६.१६ | | एरंडोल | ३१,७८७.०० | |
| भुसावळ | १२,२६८.३२ | | भुसावळ | १२,६०२.७४ | |
| रावेर | ४३,३०५.१२ | | रावेर | २३,००५.०० | |
| भरपगारी सुट्टया | | २,३६,८०९.८८ | भरपगारी रजावेतन | | |
| जळगाव | १,४५,११८.०० | | जळगाव | | १,८७,००९.०० |
| पाचोरा | २३,८०६.९५ | | | | |

| देणी | रुपये | रुपये | येणी | रुपये | रुपये |
|---|---|---|---|---|---|
| चाळीसगाव | २९,५९०.४२ | | भरपगारी सुट्टया | | |
| अमळनेर | २०,४४२.५४ | | अमळनेर | | ९,३१३.०० |
| पारोळा | २,३१०.३७ | | रजावेतन | | |
| एरंडोल | ६,१९९.३६ | | अमळनेर | | ९,३१३.०० |
| भुसावळ | २,०४४.७२ | | | | |
| रावेर | ७,२१७.५२ | | | | |
| रजावेतन | | २,३६,८०९.८८ | कामगार ॲग्रीम खाते | | ५२,००,६२६.१५ |
| जळगाव | १,४५,११८.०० | | जळगाव | २५,१५,८११.०० | |
| पाचोरा | २३,८०६.९५ | | पाचोरा | १०,००,२३४.०० | |
| चाळीसगाव | २९,५९०.४२ | | चाळीसगाव | १०,०९,६८१.११ | |
| अमळनेर | २०,४४२.५४ | | अमळनेर | ३,६७,८७७.०० | |
| पारोळा | २,३१०.३७ | | पारोळा | १,७९,११५.०० | |
| एरंडोल | ६,१९९.३६ | | एरंडोल | १,२७,९००.०० | |
| भुसावळ | २,०४४.७२ | | | | |
| रावेर | ७,२१७.५२ | | | | |
| अपघात नु. भरपाई | | ६,९१,५९१.२३ | अपघात नु. भरपाई | | ४,८०,३८९.०० |
| जळगाव | १८,८९८.८० | | जळगाव | ३,९४,६८९.०० | |
| पाचोरा | २,३९,८७४.९१ | | चाळीसगाव | ८५,७००.०० | |
| चाळीसगाव | २,३९,३३२.५८ | | कर्मचारी व्यवसाय कर | | १७,२४०.०० |
| अमळनेर | १,४६,९४५.५१ | | जळगाव | १६,८५०.०० | |
| पारोळा | २८,३०७.३८ | | पाचोरा | ३९०.०० | |
| एरंडोल | १०,९९८.३७ | | | | |
| भुसावळ | ४,३८४.४० | | | | |
| रावेर | ३,८४९.२८ | | | | |
| राखीव निधी | - | ११,००,८९३.४४ | राखीव निधी | | ५,०२,९६३.४८ |
| जळगाव | ६,१४,१६८.७६ | | जळगाव | ३,५५,१५२.०० | |
| पाचोरा | १,८२,४२९.५० | | पाचोरा | १५,०००.०० | |
| चाळीसगाव | १,५३,५८४.२२ | | चाळीसगाव | ८२,१२५.०० | |
| अमळनेर | १,००,३७२.८५ | | अमळनेर | २६,६६४.०० | |
| पारोळा | २२,१४४.४० | | पारोळा | २,२५७.०० | |
| एरंडोल | १५,६८०.२१ | | एरंडोल | १४,११०.०० | |
| भुसावळ | ३,०१२.८८ | | भुसावळ | १,०५५.४८ | |
| रावेर | ९,५००.६२ | | रावेर | ५,८००.०० | |
| मजुरी खाते | | ४१,४७३.५३ | प्रशासकीय | | २,७५,११३.०० |
| भुसावळ | ४२.०९ | | जळगाव | | |

| देणी | रुपये | रुपये | येणी | रुपये | रुपये |
|---|---|---|---|---|---|
| चाळीसगाव | ३८,५३५.५९ | | कर्मचारी भ.नि. निधी | | ३,६४,००८.०० |
| एरंडोल | १,५९६.०६ | | जळगाव | | |
| रावेर | १,२९९.७९ | | | | |
| पतपेढी अमळनेर | | १८,७४१.०० | मजुरी खाते | | ८,८१,५३७.०५ |
| | | | जळगाव | ६,०२,०४६.३७ | |
| | | | पाचोरा | ८६,९९१.२२ | |
| | | | अमळनेर | १,४५,४४५.४२ | |
| | | | पारोळा | ४७,०५४.०४ | |
| कर्मचारी भ.नि. निधी | | ५,००,३९८.०० | टि.डी.एस. | | १,६३,७७०.०० |
| | | | पाचोरा | १,६२,२५३.०० | |
| | | | जळगाव | १,५१७.०० | |
| युनियन फी जळगाव | | ३२६.०० | युनियन फी अमळनेर | | ८,३१०.०० |
| श्री. प.मो. भालेराव | | ४,२५०.०० | शार्टेज खर्च | | २,३१०.०० |
| पाचोरा शाखा (जळगाव) | २,४००.०० | ५,५१,६४०.३८ | पाचोरा शाखा (जळगाव) | २,४००.०० | ५,५१,६४०.३८ |
| पाचोरा शाखा (जळगाव) | ३८,०००.०० | | पाचोरा शाखा (जळगाव) | ३८,०००.०० | |
| पारोळा शाखा (एरंडोल) | ५०,०००.०० | | पारोळा शाखा (एरंडोल) | ५०,०००.०० | |
| एरंडोल शाखा (जळगाव) | ३३,९९१.०० | | एरंडोल शाखा (जळगाव) | ३३,९९१.०० | |
| भुसावळ शाखा (जळगाव) | ६३,६४१.८७ | | भुसावळ शाखा (जळगाव) | ६३,६४१.८७ | |
| पारोळा शाखा (भुसावळ) | ८१०.०० | | पारोळा शाखा (भुसावळ) | ८१०.०० | |
| पारोळा शाखा (जळगाव) | ३,०८,५६८.०० | | पारोळा शाखा (जळगाव) | ३,०८,५६८.०० | |
| रावेर शाखा (जळगाव) | ४,६८९.५१ | | रावेर शाखा (जळगाव) | ४,६८९.५१ | |
| पारोळा शाखा (अमळनेर) | २९,५४०.०० | | पारोळा शाखा (अमळनेर) | २९,५४०.०० | |
| जळगाव शाखा (अमळनेर) | २०,०००.०० | | जळगाव शाखा (अमळनेर) | २०,०००.०० | |
| देवी वर्गणी | | ३,६००.०० | कर्मचारी L.I.C. जळगाव | | २,२४०.०० |
| | | | भ. द. देवरे | | ४८,७३४.६५ |
| अनामत खाते | | ११,६७२.४२ | कर्मचारी ॲग्रीम | | २,४५,२८५.०० |
| अमळनेर | ३,३७८.०० | | जळगाव | २,१७,८४८.०० | |
| पाचोरा | ५,९९४.४२ | | पाचोरा | ५,०००.०० | |
| भुसावळ | २,३००.०० | | चाळीसगाव | ४,०००.०० | |
| तेरीज ताळेबंद फरक | | १,४७७.९० | अमळनेर | १६,३३५.०० | |
| पारोळा | २०१.८४ | | भुसावळ | २,१०२.०० | |
| रावेर | ३४.८४ | | येणे फरक खाते | | ६,६४५.४३ |
| अमळनेर | १,२००.३९ | | जळगाव | ३,८६९.०० | |
| एरंडोल | ४०.८३ | | पाचोरा | १,७३७.४० | |
| | | | चाळीसगाव | ९२७.९० | |
| | | | भुसावळ | १११.९३ | |

| देणी | रुपये | रुपये | येणी | रुपये | रुपये |
|---|---|---|---|---|---|
| राखीव खाते (भ.नि. निधी) | | ४०,५३,१७१.३३ | डेडस्टॉक | | १,२०,९७८.०० |
| जळगाव | ९,४२,८०२.३९ | | जळगाव | १,१८,८११.०० | |
| पाचोरा | १५,७५,२५२.७६ | | अमळनेर | ८१७.०० | |
| चाळीसगाव | १०,८६,४११.७२ | | पाचोरा | १,३५०.०० | |
| अमळनेर | २,३६,२८५.८६ | | राखीव खाते (भ.नि. निधी) | | २५,१४१.१२ |
| पारोळा | १,०८,३२५.३७ | | रावेर | २५,१४१.१२ | |
| एरंडोल | ८९,५५५.२६ | | अखेरची शिल्लक रोख | | ११,५९४.९५ |
| भुसावळ | १४,५३७.९७ | | जळगाव | १२,०९५.०० | |
| राखीव खाते (उपदान) | | ७,७४,३४२.०३ | पाचोरा | १००.०० | |
| जळगाव | २,२३,१३८.६३ | | चाळीसगाव | ३९.३३ | |
| पाचोरा | २,२२,९३७.४० | | अमळनेर | २२५.९३ | |
| चाळीसगाव | २,२२,२०७.८० | | पारोळा | ५,३४७.९७ | |
| अमळनेर | ९१,८३७.४० | | एरंडोल | -- | |
| पारोळा | १४,३२०.८० | | भुसावळ | १,४०६.३० | |
| सरप्लस | | १५,५०,९९४.१० | रावेर | ३८०.४२ | |
| जळगाव | ६,०१,७४९.७६ | | अखेरची शिल्लक बँक | | १३,१२,७१८.०५ |
| पाचोरा | ५९,४०५.९३ | | जळगाव | ७,५५,७७८.३६ | |
| चाळीसगाव | ३,०७,४५०.१० | | पाचोरा | १,८४०.६१ | |
| अमळनेर | ३,७९,७३८.३६ | | चाळीसगाव | १,५९,११०.८३ | |
| पारोळा | ९२,९२७.१० | | अमळनेर | १,९५,३९७.०० | |
| एरंडोल | ८२,४५७.९९ | | पारोळा | ३९,४०५.३५ | |
| भुसावळ | १७,८०३.९१ | | एरंडोल | ५३,६२१.५५ | |
| रावेर | ९,४६०.९५ | | भुसावळ | १७,११३.९४ | |
| | | | रावेर | ९०,३७०.४१ | |
| एकूण – | | ३,६२,३०,२९१.६५ | एकूण – | | ३,६२,३०,२९१.६५ |

सचिव, अध्यक्ष,
जळगांव माथाडी व असंरक्षित कामगार मंडळ,
जळगाव

आमच्या आज रोजीच्या अहवाल व शेऱ्यास अनुसरुन
दि. २१/०९/२०१०

Rajesh R. Kalantri & Asso.
Chartered Accountants